# प्रेसनोट

जा.क्र. ५५५ /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०५/०८/२०१७

## " खुनाचे गुन्हयात आरोपीतांना आजीवन सश्रम कारावास व द्रव्य दंडाची शिक्षा"

**भंडारा:**— भंडारा जिल्हयातील पोलीस स्टेशन भंडारा येथे दिनांक १५/०४/२०१५ चे रात्री ०८.०० वाजता दरम्यान कपुरचंद सव्वालाखे यांनी तक्रार दिली की, तक्रारदाराची पत्नी विठाबाई यांचे सोबत तक्रारदाराचा मुलगा संपत्ती व पैसे यावरुन नेहमी वाद करीत असल्याने तक्रारदार व त्यांची पत्नी हे तक्रारदाराचे पहिल्या पत्नी पासुन असलेल्या मुलाकडे मौजा बपेरा पो.स्टे आंधळगाव येथे राहण्यास गेले होते. घटना तारीख दिवशी तक्रारदाराची पत्नी नामे विठाबाई कुपरचंद सव्वालाखे ही ग्राम बपेरा येथुन तक्रारदार यास आपले राहीलेले सामान एकलारी येथुन आनण्यासाठी जाते असे सांगुन एकलारी येथे आली होती. एकलारी तक्रारदाराच्या मित्राने तक्रारदारास सकाळी ११.०० वाजता दरम्यान फोनव्दारे सांगितले की, तुझे पत्नीने काही भांडे व सामान आणायचे आहे. असे म्हणुन परत गेल्या व अजुन पर्यत परत आल्या नाही त्यावर तक्रारदार यास आपली सुन व मुलगा यांनी पत्नीस जिवानीशी ठार मारले असावे असा संशय अल्याने सदर माहिती वरुन तक्रारदार स्वत: बपेरा येथे आपले मुलासह व मोहाडी येथील भावासह एकलारी येथे आले तेथे पोलीस पाटील व पोलीस स्टेशन भंडाराचे पोलीस शिपाई पंचबुधे यांचेजवळ संशय व्यक्त केला की माझे पत्नीसोबत मुलाने काही बरे वाईट केले असावे तेव्हा त्यांचेसह घरी गेले असता घरी मुलगा नंदकिशोर कपुरचंद सव्वालाखे व सुन सौ. मोना नंदकिशोर सव्वालाखे हे घरी हजर होते. पत्नी विठाबाई बाबत विचारपुस केली असता दोघांनीही उडवा उडवी उत्तर दिली तक्रारदाराला संशय आल्याने सोबत असलेले पोलीस पाटील व नातेवाईक तसेच पोलीस कर्मचारी यांचेसह घराची झडती घेतली असता स्वयंपाक खोलीतील दिवानाला कुलुप लावलेले दिसल्याने त्यास उघडुन पाहीले असता त्यामध्ये भांडे व कपडे यांचे खाली तक्रारदाराची पत्नी विठाबाई सव्वालाखे हिचे प्रेत दिसुन आल्याने तक्रारदाराने मुलगा नंदकिशोर व सुन मोना यांचे विरुध्द पोलीस स्टेशन भंडारा येथे तक्रार दिली त्यावरुन ३०२,२०१,४०४,३४ भादंवि नुसार गुन्हा नोंद केला सदर गुन्हयाचा तपास वरिष्ठाचे मार्गदर्शनात सपोनि सुधीर वर्मा व त्यांचे पथकाने केला गुन्हयात दिनांक १६/०४/२०१५ रोजी दोन्ही आरोपीतांना अटक करुन तपास केला. तपासा मध्ये दोन्ही आरोपीतांनी पैसे व संपत्तीचे कारणावरुन यातील तक्रारदार योची पत्नी मृतक नामे सौ. विठाबाई कपुरचंद सव्वालाखे वय ६० वर्ष, रा. एकलारी हिस संगनमत करुन जिवे ठार मारुन तिचे प्रेत घरातील स्वयंपाक खोलीतील दिवाण पलंगात लपवुन प्रेताचे अंगावरील सोन्याचे दागीने काढुन घेतले व घटनास्थरावरील रक्ताचे

डाग कापडाने पुसुन घेवुन सदर कापड जाळुन टाकले व गुन्हयातील पुरावा नष्ट केला असल्याबाबत पुरावे मिळुन आल्याने सदर आरोपीतांनीच खुन करुन पुरावे नष्ट केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने दोन्ही आरोपीतांन विरुध्द दिनांक ८/०७/२०१५ रोजी दोषारोप पत्र न्यायालयात दाखल केले सदर गुन्हयाची न्यायालयीन सुनावणी मा. सत्र न्यायाधीश श्री. आर. पी.पांडे यांचे समक्ष चालली सुनावणी मध्ये सरकार पक्षातर्फे श्री. प्रमोद के. भुजाडे, सहा. सरकारी अभियोक्ता सत्र न्यायालय भंडारा यांनी कामकाज पाहीले. सुनावणी दरम्यान एकुण १३ साक्षदार तपासण्यात आले. आज दिनाक ०५/०८/२०१७ रोजी मा. सत्र न्यायाधीश श्री. आर. पी. पांडे साहेब यांनी गुन्हयात आरोपी नामे १) नंदकिशोर कपुरचंद सव्वालाखे वय ३० वर्ष, २) सौ. मोना नंदकिशोर सव्वालाखे वय २३ वर्ष, दोन्ही रा. एकलारी ता. मोहाडी यांनी दोषी ठरवत दोघांनाही खुन्हयाचे गुन्हयात आजन्म सश्रम कारावास व १०,०००रुपये दंडाची शिक्षा, दंड न भरल्यास ६ महिने सश्रम कारावासाची शिक्षा पुरावे नष्ट करण्याच्या गुन्हयात ३ वर्ष, सश्रम कारावास व ३०००रुपये दंड प्रत्येकी आणि अंगावरील सोन्याचे दागीणे काढुन घेतल्याने ३ वर्ष, सश्रम कारावासाची शिक्षा व ३००० रुपये दंड, दंड न भरल्यास ३ महिने सश्रम कारवासाची शिक्षा सुनावली. सदर गुन्हयात पैरवी अधिकारी म्हणुन सफौ. ईलमकर, पोलीस स्टेशन भंडारा यांनी पाहिले आहे. न्यायालयीन सुनावणी दरम्यान सरकारी अभियोक्ता श्री. प्रमोद के. भुजाडे यांनी सरकार तर्फे योग्य बाजु मांडली.

सपोनी. जि. एन. खंडाते
पोलीस नियत्रंण कक्ष अधिकारी
भंडारा
दुरध्वनी.९८२३३२२९५४

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.